सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४**

# माहुल खाडीसंबंधी (हक्क नष्ट करण्याबाबत) अधिनियम, १९२२

(दिनांक १५ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत सुधारित)

**Bombay Act No. IV of 1922**

# The Mahul Creek (Extinguishment of Rights) Act 1922

*(As modified upto 15th October, 2012)*

*****

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित.

२०१३

[किंमत रु. ८.००]

# सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४

# माहुल खाडीसंबंधी (हक्क नष्ट करण्याबाबत) अधिनियम, १९२२

## अनुक्रमणिका


**उद्देशिका**

| **कलमे** | | **पृष्ठ** |
|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा. .. .. .. | १ |
| २. | हक्क नष्ट करणे. .. .. .. | १ |
| ३. | हक्क नष्ट झाल्यामुळे होणारी हानी किंवा नुकसान याबद्दल द्यावयाची नुकसानभरपाई. .. .. | १ |
| | अनुसूची. .. .. .. .. | २ |

# सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४[१]

## [ माहुल खाडीसंबंधी (हक्क नष्ट करण्याबाबत) अधिनियम, १९२२ ]

**[ २० मे, १९२२ ]**

ह्या अधिनियमात सन १९२७ चा मुंबई अधिनियम, १६ याअन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**ज्याअर्थी,** मुंबई बंदराच्या विश्वस्तांना तुर्भे येथील तेलाच्या धक्क्यापर्यंत नवीन तैलनलिका मार्ग तयार करणे सुलभ व्हावे म्हणून व्यवस्था करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त तैलनलिका मार्ग योग्य रीतीने तयार करण्यासाठी व त्याचे संरक्षण करण्यासाठी, पोर्ट ट्रस्ट रेल्वेकडून सध्या राखण्यात येत असलेला माहुल खाडीवरील हालता पूल (ड्रॉब्रिज) कायमचा बंद करुन ठेवणे आणि अशा रीतीने उक्त खाडीच्या एका भागाचे समुद्राशी असलेले दळणवळण तोडून टाकणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त पुलाच्या जागेवरील उक्त खाडीतील [२] **** नौपरिवहनाचे सर्व हक्क नष्ट करणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** हा अधिनियम संमत करण्यासाठी भारत शासन अधिनियम, कलम ८०-अ, पोट-कलम ३, कंडिका (ई) व (फ) अन्वये आवश्यक असलेली गव्हर्नर-जनरल यांची पूर्वमंजुरी मिळवण्यात आली आहे ;

**त्याअर्थी,** या अन्वये, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :--

१. ह्या अधिनियमास, माहुल खाडीसंबंधी (हक्क नष्ट करण्याबाबत) अधिनियम, १९२२ असे म्हणावे. लघुसंज्ञा

२. मुंबई बंदराच्या ट्रस्टींकडून जो आता कायमचा बंद करावयाचा आहे आणि जो ह्या अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेल्या ठिकाणी माहुल खाडीच्या वर आहे त्या हालत्या पुलाच्या वरील बाजूस किंवा त्याच्या उत्तरेकडे उक्त खाडीचा जो भाग आहे त्यातील [२] *** नौपरिवहनाचे सर्व हक्क सन १९२२ च्या जून महिन्याच्या पहिल्या तारखेपासून नष्ट होतील. हक्क नष्ट करणे.

३. (१) हा अधिनियम संमत झाल्यावर, मुंबईच्या कलेक्टरने, असे हक्क नष्ट झाल्यामुळे कोणत्याही इसमाची जी कोणतीही हानी किंवा नुकसान झाले असेल त्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची व्यवस्था करण्याच्या कामास लागले पाहिजे. अशी व्यवस्था, कलेक्टरने त्यास भूमि संपादन अधिनियम, १८९४, कलम ७ अन्वये, भूमि संपादन करण्यासाठी व्यवस्था करण्याबद्दल निदेश देण्यात आला असता ज्या रीतीने केली असती त्याच रीतीने शक्य तेथवर केली पाहिजे. हक्क नष्ट झाल्यामुळे होणारी हानी किंवा नुकसान याबद्दल द्यावयाची नुकसानभरपाई.

१८९४ चा १.

---

१. उद्देश व कारणे यांसाठी पहा मुंबई शासन राजपत्र, १९२२, भाग पाच, इं. पृ. २.

२. सन १९२७ चा मुंबई अधिनियम क्रमांक १६ द्वारे मूळ मजकूर निरसित करण्यात आला. हे निरसन १९२२ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ४ अंमलात आल्याच्या दिनांकापासून करण्यात आले असल्याचे व त्या दिनांकापासून अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

परंतु, जर भरती-ओहोटी अधिकारांच्या हानीबद्दल नुकसानभरपाईसाठीचा दावा मुंबईच्या कलेक्टरच्यासमोर दाखल करण्यात आला असेल आणि जेव्हा हा अधिनियम अंमलात आला तोवर दावा अभिनिर्णित झाला नसेल तर, कलेक्टरांच्यासमोर कार्यवाही प्रलंबित असल्यादरम्यानचा कालावधी कोणत्याही अशा दाव्याची मुदत मोजतांना वगळण्यात आला पाहिजे जो यापुढे अशा भरती-ओहोटी काळातील अधिकारांमधील हस्तक्षेपामुळे झालेल्या नुकसानभरपाईसाठी दाखल केलेला असू शकेल. पहा १९२७ चा मुंबई अधिनियम क्रमांक १६, कलम ३.

१८९४ चा १. (२) नुकसानभरपाईची रक्कम शक्य तेथवर, भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या उपबंधांस अनुसरून, कलेक्टरांकडून ठरविण्यात व देण्यात आली पाहिजे अथवा कलेक्टराचा निवाडा मान्य करण्यात आला नाही तर, अशी रक्कम न्यायालयाकडून ठरविण्यात व देण्यात आली पाहिजे.

— — — —

## अनुसूची

(कलम २ पहा)

हालत्या पुलाची जागा सिटी सर्व्हे शीट क्रमांक ५८७ यांत दर्शविल्याप्रमाणे पाकडी खाडीच्या मध्यरेषेच्या उत्तरेस माहुल खाडीच्या पश्चिम कडेच्या बाजूने मोजता सुमारे ६०० फुटांवर आहे व सिटी सर्व्हे शीट क्रमांक ५८९ यांत दर्शविल्याप्रमाणे चांदणी खाडीच्या मध्यरेषेच्या दक्षिणेस माहुल खाडीच्या पश्चिम कडेच्या बाजूने मोजता ९०० फुटांवर आहे. सिटी सर्व्हे शीट क्रमांक ५८७ यात दर्शविल्याप्रमाणे ती जागा लक्ष्मण गोविंद मिठागराजवळ असलेल्या जुन्या बुरुजाच्या पूर्वेस सुमारे ७३० फुटांवर आहे.

— — — —

एच ७६३-४,१३०-१०-२०१३

**शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर**

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**

  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**

  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**

  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते